International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.2 Nov-Dec 2023

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी विषयक विचार

**डॉ. निलेश गोकुळ शेरे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, कला, विज्ञान आणि वाणिज्य, महाविद्यालय, नळदुर्ग जि. उस्मानाबाद.
**Corresponding Author – डॉ. निलेश गोकुळ शेरे**
**DOI- 10.5281/zenodo.10559261**

**प्रस्तावनाः**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर एक राज्यघटनेचे शिल्पकार, कायदेपंडित, शिक्षणतज्ञ, समाजसुधारक इत्यादी म्हणून समाजात परिचित आहेत. परंतु ते कृषी तज्ञ म्हणून फारशी परिचित नाहीत म्हणूनच या शोधनिबंधाच्या माध्यमातून त्यांचे कृषी विषयक विचार मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. प्राचीन काळापासून भारतीय लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे. याच भारतीय शेतकरी कष्टकरी लोकांसाठी मुलगामी योजना आखून त्या प्रत्यक्ष कृतीत आणण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. भारतीय शेती ही मोजणी हवामानावर अवलंबून असल्याने त्याचा परिणाम शेती उत्पादनावर होतो. म्हणजेच भारतीय अर्थव्यवस्थेवर होतो. त्यासाठी शेती, शेतकरी, शेतमजूर, उद्योगधंदे यांचा शाश्वत विकास झाला पाहिजे त्यासाठी जलसिंचन ऊर्जा आधुनिक तंत्र नैसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन शेतीला उद्योगाचा दर्जा देणे व कृषी उत्पन्न वाढ करण्यासाठी डॉ. आंबेडकरांची भूमिका अत्यंत मोलाची आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय शेतीविषयक विचारः**

भारतीय शेतीच्या समस्यांचे डॉ. ओबेडकरांनी सविस्तर विवेचन केलेले आहे. स्टेट अँन्ड मायनॉरिटी या लेखात 1947 मध्ये तसेच जर्मन ऑफ इंडियन इकॉनोमिक सोसायटी या नियतकालीकमध्ये 1818 मध्ये स्मॉल होल्डिंग्ज इन इंडिया' या लेखामध्ये भारतीय शेतीसंबंधी त्यांनी आपली शेतीसंबधीची भूमिका व्यक्त केलेली आहे. भारतातील नागरिकांचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे. भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्था अत्याधिक शेतीवर आहे भारतातील कृषी समस्यामध्ये कृषी उत्पादन, शेतजमिनीचा आकार किफायतशीर धारणक्षेत्र, जमीन धारणेची मा मर्यादा यावर त्यांनी चिंतन केलेले आहे. भारतात धारणक्षेत्राचा आकार उत्तरोत्तर लहान होत असून छोट्या आकाराच्या जमिनी तयार होत आहेत. यावर त्यांच्या मते 'जेव्हा शेतजमीन हा उपजीविकेचा एकमेव व्यवसाय असतो व वारसा हक्क कायद्यामुळे प्रत्येक वारसाला शेत जमिनीचा हिस्सा कायद्याने दिला जातो तेव्हा शेतजमिनीचे विभाजन व अपखंडन होऊन शेतजमिनीचा आकार लहान बनतो. भारतातील निरनिराळ्या राज्यात शेत जमिनीचा आकार सरासरीने घटत चालल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निदर्शनास आणून दिले होते यावरून भारत हा अल्पभूधारक शेतकऱ्यांचा देश आहे असा त्यांनी निष्कर्ष काढला होता.

डॉ.आंबेडकरांनी भारतातील कृषी क्षेत्रातील समस्यांच्या उपायांमध्ये औद्योगीकरण हे कारण सांगितले आहे त्यांच्यामध्ये तुकड्या तुकड्यात असलेले कृषी क्षेत्र एकत्र करावे अशा कृषी क्षेत्रा जवळ औद्योगीकरण करावे त्यातून येणारा पैसा परत कृषी क्षेत्राच्या विकासासाठी उपयोगात आणावा ज्यामुळे कृषी उत्पादन आणि जमीन दोन्हींच्या मूल्यांमध्ये वाढ होऊन शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्या संपवण्यासाठी मदत होईल तसेच भारताच्या आर्थिक विकासासाठी औद्योगिकीकरणाची गती वाढवण्याची जितकी आवश्यकता आहे तितकीच आवश्यकता भारताच्या आर्थिकतेचा पाया असलेल्या कृषी क्षेत्राच्या विकासाची गती वाढविण्यात ची आहे कृषी क्षेत्राच्या विकासाकडे दुर्लक्ष करून उत्पादन वाढवण्याची कोणतीही योजना कारणीत करणे म्हणजे सत्यानाश ओढून घेणे होय अशाप्रकारे शेती क्षेत्राला अनन्यसाधारण असे महत्त्व डॉक्टर आंबेडकरांनी दिले होते.

सहकारी तत्त्वावर आधारित शेती करणे महत्त्वाचे- सहकारी तत्त्वावर आधारित शेती संदर्भात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या मते सरकारने ठरवून दिलेल्या परिणाम अनुसार सहकारी तत्त्वावर शेती केली जावी शेतीचे क्षेत्र आणि मालकी कायम ठेवून ती सहकारी तत्त्वावर केल्यास अल्पभूधारकावर आर्थिक ताण पडणार नाही भागधारक कंपनी सदस्याप्रमाणे सहकारी तत्त्वावरील शेतीमध्ये समाविष्ट होणारा शेतकरी हा भागधारक सदस्य राहील आणि सहकारी शेतीतील नफा नुकसानीमध्ये सारखाच जबाबदार राहील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची सहकारी शेतीच्या बाबतची ही कल्पना अफलातून आहे आजपर्यंत कोणत्याही शासनाने किंवा व्यक्तीने या कल्पनेवर अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला नाही त्यांच्यामध्ये शेती विकासाचा संबंध हा जमीन धारणेशी जमिनीच्या मालकीची जोडला गेला पाहिजे याचा

संबंध हा फक्त आर्थिक घटकाशी नसून तो सामाजिक अस्मितेचे आहे तत्कालीन व्यवस्थेत आणि आजही उच्च वर्गाकडे मोठ्या आकाराच्या जमिनी आहेत तो वर्ग स्वतः जमीन न करता मध्यमवर्गाकडून कुळामार्फत कसून घेत कुळाकडून प्रचंड खंड आकारून त्यांची पिळवणूक केली जात असे.

जमिनीच्या धरण क्षेत्राबाबत आंबेडकरांनी आपले स्पष्ट मत व्यक्त केले आहे त्यांच्यामध्ये उपभोगापेक्षा उत्पादनाला प्राधान्य दिले पाहिजे याबाबत ते म्हणतात की पायतशीर धरण क्षेत्र म्हणजे भूमी श्रम भांडवल या घटकांचा असा युक्त तम घटक संयोग जेथे मिळणारे कृषी उत्पादक सर्वाधिक असेल या घटक संयोगातील बदल हा कृषी उत्पादनावर प्रतिकूल परिणाम करेल आज देशपातळीवरील धारण क्षेत्राचे आकारमान वेगाने कमी होत चालले आहे डॉ. आंबेडकरांच्या मते वारसा हक्काने जमिनीचे विभाजन व अपखंडन होत आहे शिवाय त्यांचा इतर कोणत्याही उदरनिर्वाहाचा मार्ग उपलब्ध नसल्याने आणखी तुकडे पडत आहेत या पार्श्वभूमीवर शेतीच्या उत्पादकतेचा विचार करताना फक्त लहान धारण क्षेत्रातच कमी उत्पादक ते साठी कारणीभूत नसून त्याचबरोबर शेतीत वापरणारे तंत्रज्ञान हवामान जमिनीचा कळस पावसाचे प्रमाण सिंचनाच्या सोयी शेतीमाल किंमत सरकारी गुंतवणूक इत्यादी घटक विचारात घेणे फार महत्त्वाचे आहे असे मूलभूत विचार त्यांनी मांडले डॉक्टर आंबेडकरांनी सामुदायिक शेतीचा पुरस्कार केला होता त्यांच्यामध्ये जातिभेद किंवा इतर कोणत्याही घटकांचा आधार न घेता सर्व गावकऱ्यांना सामावून घ्यावे त्यांच्यामध्ये कोणतीही जमीनदार कुळ तसेच शेतमजूर ही असणार नाही अशा प्रकारच्या शेती प्रकारातून जे निवळ उत्पन्न राहील ते गावकऱ्यांनी आपापसात वाटून घ्यावे ही सर्व प्रक्रिया कायद्याच्या चौकटीनुसारच करावी ज्यामुळे कोणावर अन्याय होणार नाही.

**खोतीपद्धत नष्ट करण्यासाठी विधेयक:**

शेतकऱ्यांच्या शोषणाबाबत डॉ. बाबासाहेबांनी प्रखर असे विचार मांडले होते. शेतकऱ्यांना शासनाकडून पुरेशा आर्थिक पाठबळ न मिळाल्यानेच ते सावकारांचा आधार घेतात त्यामुळे ते अडकून पडतात व शेवटपर्यंत त्यांची यातून सुटका होत नाही. शेतीमध्ये असणाऱ्या जातक अश्या खोती पद्धती बद्दल ही त्यांनी खडक शब्द सुचवले होते. मुंबई व कोकण विभागात ही पद्धत प्रचलित होती. या पद्धतीत शेतसारा गोळा करण्यासाठी शासनाने खोताची नियुक्ती केली होती. जमिनीतून होणाऱ्या उत्पन्नाचा अर्धा भाग आणि वर्कस जमिनीतील पिकाचा एक तीर्थ भाग खोताने कुळाकडून वसूल करावा अशी ही पद्धत होती. या पद्धती विरोधात कोकणातील शेतकऱ्यांनी इसवी सन 1933 ते 1939 पर्यंत संप पुकारला. या संपास बाबासाहेबांनी पाठिंबा देऊन ठिकठिकाणी अनेक सभा घेतल्या. या आंदोलनाच्या परिणामातूनच 17 सप्टेंबर 1973 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी खोती पद्धत नष्ट करण्याची विधेयक मुंबई विधिमंडळात मांडले. 10 जानेवारी 1938 रोजी मुंबई कौन्सिलच्या असेंबलीवर भव्य मोर्चा काढण्यात आला यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भाषण केले ते म्हणाले की आपले हितकर्ते कोण आहेत आपले शोषण करते कोण आहेत सावकार, जमीनदार यांच्यापासून कष्टकरी, श्रमजीवी यांचे कल्याण होणार नाही. मुठभर लोक तुमच्यावर सत्ता गाजवीत आहेत त्यांच्याविरुद्ध संघटित करण्याची गरज आहे .सरकारचे सहाय्य मिळण्याची शक्यता नसल्याने आपण आपली स्वतंत्र संघटना करून सर्व प्रकारचे भेद विसरून धडा दिला पाहिजे. यावेळी सरकारकडे मूलभूत अशा 4 तर तातडीच्या 13 मागण्या करण्यात आल्या होत्या. या संपाच्या आणि मोर्चाच्या परिणामामुळे तत्कालीन महसूल मंत्री मोरारजी देसाई यांनी नेमलेल्या समितीने दिलेल्या अहवाल शेतकरी व खोतांनी स्वीकारला. या प्रदीर्घ संपामुळे 1948 साली जमीन महसूल संचिता बदलली होती.

**सामायिक शेती विषयी विचार:**

डॉ. आंबेडकरांनी शेती पद्धतीच्या संदर्भात मांडलेली भूमिका फार क्रांतिकारक होती. शेतीच्या संदर्भात जमिनीचे राष्ट्रीयकरण व सामूहिक शेतीचे त्यांनी समर्थन केले आणि सामूहिक शेतीची व्यवस्थापन व चौकट तयार केली. राज्य शासनाने शेतीही राष्ट्रीयकृत करावी. त्या बदल्यात शेतमालांना जमिनीच्या मूल्यानुसार आर्थिक नुकसान भरपाई कर्जरोख्याच्या स्वरूपात द्यावी. राज्य शासनाने जमीन ताब्यात घेतल्यानंतर त्या जमिनीचे गाव पातळीवर जमीनचे पर्याप्त आकारमानात तुकडे करून शेती करण्यासाठी द्यावी. जमिनीचे आकारमान पर्याप्त असल्यामुळे अशा शेतीत जैविक रसायनिक व यांत्रिक साधनाचा पर्याप्त वापर होतो व त्यामुळे अशा शेतीतून जास्त उत्पादन उत्पादित करणे शक्य होते. शेतीच्या विकासाला अनुकूल परिस्थिती यामुळे निर्माण होते. राज्य शासनाचे नियम व मार्गदर्शक तत्त्वानुसार सामूहिक शेतीचे व्यवस्थापन होईल. सर्व कृषी साधने, वित्तीय मदत व इतर सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी सरकारची राहील. शेतीतून उत्पादित झालेल्या शेतमालाच ठरल्याप्रमाणे सरकारला खंड दिल्यानंतर उरलेल्या शेतमालाचे वितरण मुलांनी आपापसात करावे. अशा प्रकारची सामूहिक शेती विकसित झाली तर ग्रामीण भागातील जमीनदारीची पद्धत आपोआप नष्ट होईल व शेतीच्या विकासाला चालना मिळेल.

**जल व विद्युत धोरण:**

देशाच्या शेती आणि उद्योग या दोन्ही महत्त्वाच्या आर्थिक क्षेत्राच्या विकासासाठी अत्यावश्यक असणारी

सिंचन व ऊर्जा ही दोन्ही महत्त्वाची पायाभूत क्षेत्रे विकसित करण्याचा पाया घातला गेला तो डॉ. आंबेडकरांच्या व्यवहारीक दृष्टिकोनामुळेच. देशाच्या पाणी प्रश्नाचा दुर्गामी सर्वच विचार डॉ. आंबेडकर यांनी सुरुवातीपासूनच केला.

**जलनीतीची तीन सूत्रे**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी या क्षेत्राच्या विकासासाठी जलनीती तयार केली ती तीनसूत्रावर आधारित होती.

1) जलसंपत्ती विकासासाठी नदी खोरे क्षेत्र हा आधार धरून सिंचन प्रकल्पाचे नियोजन करताना बहुउद्देशीय दृष्टिकोन ठेवणे आवश्यक आहे.शेती सिंचन पिण्यासाठी पाणी औद्योगिक विकास योजनांसाठी जलवाहतूक वीज निर्मिती अशी उद्दिष्टे असावीत.

2) जल प्रकल्पाची उभारणी करण्यासाठी नदी खोरे प्राधिकरण ही प्रशासकीय व्यवस्था असावी.

3) जलसंपत्ती आणि ऊर्जा क्षेत्राच्या नियोजित विकास योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी केंद्र स्तरावर कुशल तंत्रज्ञानाच्या गटाची निर्मिती करावी.

थोडक्यात या सर्व मुद्द्यावर डॉ. बाबासाहेबांनी अध्यक्ष भाषणातून वेळोवेळी विचार व्यक्त केले होते आणि प्रांतीय सरकारची संमती मिळवली होती.कारण त्या काळात प्रांतीय सरकारच्या अधिपत्याखाली हे विषय होते व त्याला त्यांचा विरोध होता.

**विद्युत धोरण**

डॉ. बाबासाहेबांनी व त्यांच्या श्रम खात्याने वीजनिर्मिती प्रश्नाचा सखोल अभ्यास केला. १९४३ ते १९४५ दरम्यान झालेल्या बैठका, चर्चा व वैयक्तिक देवाणघेवाणीमधून विद्युतविकासाची गरज स्पष्ट केली व आराखडा तयार केला. वीजनिर्मिती, वितरण व व्यवस्थापन इत्यादी महत्त्वाच्या बाबी आहेत. त्यांच्या मते, केंद्र सरकारने वीज उत्पादन आणि वितरण या क्षेत्रांत प्रत्यक्ष सहभागी झाले पाहिजे. श्रम खात्याने तयार केलेल्या अंतिम मसुद्यात समाविष्ट केलेल्या महत्त्वाच्या बाबी नंतर युद्धोत्तर विकास योजनेमध्ये समाविष्ट केल्या. नव्या ऊर्जा धोरणाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे राष्ट्रीय स्तरावर सार्वजनिक वीजपुरवठ्याचा विकास व विस्तार करण्यासाठी केंद्रीय स्तरावर एक तांत्रिक समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला व जलविद्युत प्रश्नांची सोडवणूक करण्याची जबाबदारी समितीकडे सोपविण्यात आली. सध्या जे केंद्रीय ऊर्जा प्राधिकरण आहे, त्याची सुरुवात १९४४ मध्ये स्थापन झालेल्या केंद्रीय तांत्रिक ऊर्जा मंडळातून झाली, हे विशेष.

**सारांश**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शेतीविषयक मांडलेल्या विचारांचा विचार करता आजच्या काळात सुद्धा डॉ. आंबेडकरांच्या विचारांचे नितांत गरज आहे. अशा विचारांची धोरणांची अंमलबजावणी झाली तर सर्वसामावेशक आर्थिक विकासाला चालना मिळाली असती आणि समाजाच्या आर्थिक व सामाजिक कल्याणासाठी अधिक अनुकूल परिस्थिती निर्माण झाली असती. भारतीय शेतीच्या गंभीर समस्यांची पार्श्वभूमी लक्षात घेतली तर आजही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कृषी विषयक भूमिकेची किती नितांत गरज आहे हे लक्षात येते.

**संदर्भ सूची**

1. महाराष्ट्र शासन, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लिखाण व व्याख्याने, खंड –एक, 1979.
2. समाज प्रबोधन पत्रिका, डिसेंबर, 2016.
3. लोकराज्य, एप्रिल, 2018
4. अस्मितादर्शक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर शत्कोत्तर रजत जयंती विशेष अंक, 2016.